| | |
|---|---|
| **MHLA160001462018** | <u>नियमित दिवाणी दावा क्र.३१/२०१८</u><br><u>उमाकांत वि. आप्पासाहेब</u> |

-:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::-

वादी आणि त्यांचे अधिवक्ता हजर आहेत. प्रतिवादीचे अधिवक्ता श्री. पाटील हजर आहेत. मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. वादीने साक्षप्रतिज्ञालेख निशाणी ४४ हा दि.११/११/२०२२ रोजी दाखल केला होता. परंतु वादी पुराव्याकरिता हजर न राहिल्याने दि.३०/१०/२०२३ रोजी सदर पुरावा काढून टाकला. वादीने अर्ज निशाणी ४७ प्रमाणे पुरावा नोंदविण्याकरिता परवानगी मागितली होती. सदर अर्ज दि.१३/०३/२०२४ रोजी मंजूर झालेला आहे. परंतु वादीने पुरावा देण्यास कसूर केला. तसेच वादीचे ईतर साक्षीदार सुध्दा हजर नाहीत. सबब वादीच्या कसुरामुळे वादीची साक्ष पुरावाबंद करणे योग्य ठरेल. सबब वादीने त्याची नोंद घ्यावी आणि साक्ष पूर्ण करावी अन्यथा सदर साक्ष काढून टाकण्यात येईल आणि दावा खारीज करण्यात येईल.

०२. आदेश संगणकावर टंकलिखीत केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.07.16 17:28:37 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – १६–०७–२०२५**

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवणी.**